# एचपीएलचा विस्तार कार्यक्रम

**मुंबई –** 'एचपीएल ग्रुप'ने विस्ताराचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला असून त्याअंतर्गत देशभर उपलब्ध असलेल्या आपल्या सध्याच्या उत्पादन श्रेणीत मॉड्युलर स्विचेस व खास सुट्या भागांची भर घातली आहे.यासंदर्भात समूहाचे सह व्यवस्थापकीय संचालक गौतम सेठ म्हणाले, स्मार्ट मॉड्युलर स्विचेसची नवी श्रेणी ग्राहकांचे समाधान करेल. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेले हे आकर्षक स्विच चोखंदळ ग्राहकांना नक्कीच पसंत पडावेत, अशीच त्यांची रचना करण्यात आली आहे. ग्राहकांना सर्वोत्तम उत्पादने देण्याची परंपरा कायम राखण्यासाठी 'एचपीएल'ने २ नवे उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी १२० कोटी रुपये गुंतवणूक केली आहे. हे प्रकल्प ४००००० चौरस फूट क्षेत्रात विस्तारलेले असून तेथे प्रगत विद्युत उपकरणे बनवली जातील. यातील एक प्रकल्प केवळ स्विचगिअर्स, लायटिंग व ल्युमिनरीजसाठी राखीव असून दुसरा प्रकल्प हा इलेक्ट्रॉनिक एनर्जी मीटर विभागाचा विस्तार आहे. या व्यवसाय विस्तारातून पुढील ३ वर्षांत १५०० कोटी रुपये उलाढालीचा टप्पा गाठण्याचे समूहाचे ध्येय आहे.